नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४९ Issue - 49 | वार शनिवार दि. ५ जुलै २०२५ Blow- Saturday Date 5 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# हिमाचल प्रदेशात पावसाचं थैमान! दोन आठवड्यांत ४५ जणांचा मृत्यू

## ३७ जण बेपत्ता; सात जण वाहून गेले, उत्तराखंडमध्ये तलावात दोन जवान बुडाले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिमला: हिमाचल प्रदेशात २० जून रोजी मान्सून दाखल झाल्यापासून मागील दोन आठवड्यांत ढगफुटी, पूर, दरडी कोसळणे यांसारख्या आपत्तींमुळे ४५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३७ जण बेपत्ता आहेत. या कालावधीत अतिवृष्टीमुळे राज्यात पाच हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली.

अतिवृष्टीमुळे झालेल्या १४ जणांचा मृत्यू ढगफुटीमुळे, आठ जणांचा अचानक आलेल्या पुरामुळे, तर एकाचा भूस्खलनामुळे झाला, तर सात जण वाहून गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अतिवृष्टीचा सर्वाधिक तडाखा मंडी जिल्ह्याला बसला असून, मंगळवारी ढगफुटी, अचानक पूर आणि भूस्खलनाच्या १० घटनांमध्ये १७ जणांचा मृत्यू झाला. केवळ मंडी जिल्ह्यात ३१ लोक बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाच्या जवानांनी शुक्रवारी भराड, देजी, पायला आणि रुकचुई या गावांत अडकलेल्या ६५ जणांची सुटका करून सुरक्षितस्थळी हलवले.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन, रस्ते वाहून जाणे आणि नद्यांना आलेले पूर यांमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून वाहून आलेला राडारोडा लोकांची घरे तसेच शेतांमध्ये साचला आहे. राज्यात १५० घरे, १०६ गोठे, ३१ वाहने, १४ पूल आणि अनेक रस्त्यांची हानी झाली असून, १६४ गुरे वाहून गेली आहेत. सुटका केलेल्या ४०२ जणांसाठी पाच मदत शिबिरे उभारण्यात आली आहेत. यातील ३४८ जण एकट्या मंडी जिल्ह्यातील आहेत.

दरम्यान, हिमाचल प्रदेशातील २८० रस्ते वाहनांसाठी बंद करण्यात आल्याचे राज्य आपत्कालीन कामकाज केंद्राकडून जाहीर करण्यात आले आहे. यातील १५९ मंडी, ४९ सिरमौर आणि ३६ कुलू जिल्ह्यातील आहेत.

राज्यात आज शनिवारपासून ते मंगळवारपर्यंतच्या कालावधीत काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देत 'ऑरेंज अॅलर्ट' स्थानिक हवामान विभागाने जारी केला आहे.

### उत्तराखंडमध्ये तलावात दोन जवान बुडाले

देहराडून : उत्तराखंडमध्ये अतिवृष्टीमुळे पाण्याची पातळी वाढलेल्या भीमताल तलावात हवाई दलाचे दोन जवान मृत्युमुखी पडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. प्रिन्स यादव (२२, पठाणकोट, पंजाब) आणि साहिल कुमार (२३, मुझफ्फरपूर, बिहार) अशी त्यांची नावे आहेत.

# मराठीचा नारा एकत्र घुमणार! ठाकरे बंधूंचा आज विजयी मेळावा



मुंबई : त्रिभाषा धोरणातील हिंदीच्या सक्तीविरोधातील निर्णय सरकारने मागे घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या मनसेकडून आज, शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या विजयी मेळाव्यासाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे. सकाळी १० वाजता वरळी डोममध्ये हा मेळावा पार पडणार असून त्यासाठी जागोजागी बॅनरबाजी करण्यात आली. 'आवाज मराठीचा' या भावनिक संदेशासह ठाकरे बंधूंनी जनतेला या मेळाव्याचे निमंत्रण दिले आहे. या विजयी मेळाव्यात ठाकरे बंधू कार्यकर्त्यांना काय आदेश देणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मात्र या आदेशापूर्वीच अनेक कार्यकर्ते, संस्थांनी बॅनरबाजी केलेली दिसली. 'आम्ही गिरगावकर' संस्थेकडून ठिकठिकाणी बॅनरबाजी करण्यात आली. आणखी एका बॅनरद्वारे तर 'महाराष्ट्रात मराठी मराठीसाठी ठाकरेच! सभा झाल्यावर फक्त आदेश द्या, कोणकोणत्या मराठी, महाराष्ट्रद्रोही लोकांना सरळ करायचे आहे? आम्ही आदेशाची वाट पाहत आहोत,' असा इशारा देण्यात आला आहे. 'ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार व्हा!' आणि 'ब्रँड मराठीचा' असा मजकूर असलेले बॅनरही वरळी परिसरात झळकले आहेत. या बॅनरमध्ये राज आणि उद्धव ठाकरे गळाभेट घेताना, बाळासाहेब ठाकरे त्यांना आशीर्वाद देताना दाखवले आहेत. आदित्य ठाकरे, अमित ठाकरे, तसेच दोन्ही पक्षांचे प्रमुख नेते, खासदार-आमदार यांचीही छायाचित्रे लावण्यात आली आहेत.

## लक्ष लक्ष नयनांनी अनुभवला रिंगण सोहळा

# बाजीराव विहीर येथे पार पडले उभे आणि गोल रिंगण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेकरीता पंढरपूच्या दिशेने निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील गोल व तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील उभे रिंगण शुक्रवारी बाजीराव विहिरीच्या जवळ रंगले. आनंदाने वारकरी विठू नामाच्या जयघोषात नृत्यमध्ये तल्लीन झाले होते. बाजीराव विहीर परिसरात रिंगणाचा सोहळा वारकर्यांनी अनुभवला. रिंगण सोहळ्याचा आनंद महामार्गाच्या उड्डाणपुलावरुन भाविकांना घेता आला. या भव्यदिव्य रिंगण सोहळ्यामुळे शेकडो किलोमीटर अंतर पायी आलेल्या वारकर्यांचा शीण गेला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सावळ्या विठूरायाच्या दर्शनासाठी राज्यासह, देशाच्या विविध भागातून निघालेल्या संतांच्या पालख्या शुक्रवारी वाखरीत दाखल झाल्या.

तत्पुर्वी, दुपारी १ वाजता भंडीशेगाव येथून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने प्रस्थान ठेवला. त्यापूर्वी संत सोपान काका यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे निघाला. त्यानंतर पिराची कुरोली येथून जगदगुरु संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा निघाला होता. पालखी सोहळ्यातील वारकर्यांनी संतांच्या पालख्यांचे दर्शन घेत आपापल्या सोहळ्यात सहभाग घेतला.

संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा उभे रिंगणसाठी बाजीराव विहीर समोर आला. उडाणपूलाच्या शेजारील सर्व्हिस रस्त्यालगत लागलेले रिंगण पाहण्यासाठी वारकर्यांनी उड्डाणपुलावर गर्दी केली होती. दुपारी ४.०० वाजता उभे रिंगण पूर्ण झाले. त्यापूर्वी मैदानावर वारकर्यांनी फुगड्या, सुरपाट्यांच्या खेळासह, भारुडांचे कार्यक्रम सुरु केले होते. रिंगण पाहण्यासाठी वाखरीच्या पालखी तळावर दाखल झालेल्या विविध संतांच्या दिंडी सोहळ्यातील हजारो वारकरी बाजीराव विहीर परिसरात दाखल झाले होते.

तर सायंकाळी ५.०० वाजता संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा रिंगण स्थळी आला. यानंतर सेवेकर्यांनी टाळमृदंगाचा तालावर खांद्यावरून पालखी नाचवत रिंगण पाहण्यासाठी थांबलेल्या वारकर्यांच्या भोवतीने गोल रिंगण घातले. त्यानंतर मानाच्या दिंड्यांनी झेंडा घेऊन रिंगणात प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर अश्वस्वार रिंगणाला सुरवात झाली. अश्वांनी तीन फेर्या पुर्ण करत रिंगण पुर्ण केले. रिंगण पुर्ण होताच अश्वांच्या टापाची माती कपाळी लावण्यासाठी भाविकांची झुंबड उडाली.

### वाखरी मुक्कामी पालखी सोहळा विसावला

पालखी सोहळा वाखरी मुक्कामी विसावला-

संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळयातील सोलापूर जिल्ह्यातील दुसरे उभे रिंगण तर चौथे गोल रिंगण बाजीराव विहीर येथे पार पडले. यानंतर सायंकाळी पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर असलेल्या वाखरी पालखी तळ येथे विसावला. शनिवारी वाखरी येथून दुपारी पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. पंढरपूरच्या वेशीवर पालखी सोहळे आल्याने भाविक पांडुरंगाचा जयघोष करीत आहेत.



## संपादकीय....

# सेबीची कारवाई

भारतातील बाजार नियामक संस्था सेबीनं एक महत्त्वाचा आदेश जारी करत जेन स्ट्रीट ग्रुप आणि त्या कंपनीशी संबंधित कंपन्या जेएसआय इन्वेस्टमेंट प्रायवेट लिमिटेड, जेएसआय २ इन्वेस्टमेंट प्रायवेट लिमिटेड, जेन स्ट्रीट सिंगापूर प्रायवेट लिमिटेड आणि जेन स्ट्रीट एशिया ट्रेडिंग लिमिटेडला शेअर बाजारात व्यवहार करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सेबीच्या मते कंपनीला थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेअर खरेदी किंवा विक्रीला कसल्याही प्रकारची मान्यता नसेल. सेबीनं त्यांच्या आदेशात म्हटलं की जेन स्ट्रीटनं जो ४८४३ कोटींचा अवैध फायदा मिळवला आहे तो जप्त केला जाणार आहे. या कंपन्यांना ही रक्कम भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त बँकेत एका एस्क्रो खात्यात जमा करावी लागेल. जेन स्ट्रीटला बँक खात्यातून पैसे काढण्यावर मनाई करण्यात आली आहे. सेबीच्या परवानगीशिवाय कोणताही व्यवहार जेन स्ट्रीटला करता येणार नाही. जेन स्ट्रीटला त्यांच्या खुल्या बाजारातील व्यवसायाची स्थिती पुढील तीन महिन्यात किंवा त्यांना देण्यात आलेल्या वेळेपूर्वी बंद करावी लागेल. कंपनीचे जे प्रलंबित व्यवहार असतील ते पूर्ण करावे लागतील. फ्यूचर्स अँड ऑप्शन्स व्यवहारात कॅश इक्विवॅलेंटचा अर्थ अशा गोष्टी ज्यांचं रुपांतर सहजपणे रोख रकमेत करता येईल. ज्याला शॉर्ट टर्म गुंतवणूक म्हटलं जातं. ट्रेडर ते गहाण ठेवत मार्जिन म्हणून वापर करु शकतात. यामध्ये त्यांना व्याज कमावण्याची संधी मिळते. याशिवाय ते फ्यूचर्स अँड ऑप्शनचे सौदे करु शकतात. जेन स्ट्रीटवर या पद्धतींचा वापर गैरवापर केल्याचा आरोप आहे. एप्रिल २०२४ ला वृत्तपत्रांमधील बातम्यांच्या आधारावर सेबीनं चौकशी सुरु केली. जेन स्ट्रीटनं भारतीय बाजारात बेकायदेशीर व्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला होता. जुलै २०२४ मध्ये सेबीनं नॅशनल स्टॉक एक्सचेंजला जेन स्ट्रीटच्या कारभाराची चौकशी करण्याचा आदेश दिला. ऑगस्ट २०२४ मध्ये सेबीनं जेन स्ट्रीटशी चर्चा करुन त्यांच्याकडून उत्तर मागितलं. नोव्हेंबर २०२४ मध्ये एनएसईनं सेबीला चौकशी अहवाल सोपवला. डिसेंबर २०२४ ला सेबीनं एक्सपायरी डे ला बाजारात असाधारण उतार आणि तेजी होत असल्याचं पाहिलं. ज्यामध्ये जेन स्ट्रीट जोखीमवाले सौदे करत होती. फेब्रुवारी २०२५ मध्ये जेन स्ट्रीटकडून नियमांचं उल्लंघन होत असल्याचं सेबीच्या लक्षात आलं. एनएसईनं कंपनीला इशारा दिला की त्यांनी हेराफेरी असणारे सौदे बंद करावेत. मे २०२५ मध्ये जेन स्ट्रीटनं इशारा लक्षात न घेता मोठे सौदे केले. त्यानंतर सेबीकडून कारवाई करण्यात आली आहे.

# 'श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा' पंढरपूर भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. एस. एन. पठाण, महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च शिक्षण संचालक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू, तर अखिल भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे (I.C.C.R.न्यू दिल्ली) उपाध्यक्ष व एक ज्येष्ठ शिक्षणतज्ञ म्हणून सार्या या महाराष्ट्रा ला सुपरिचित आहेत.

समाजात सामाजिक सलोखा राहावा व ज्ञानेश्वर माऊलींचा 'आता विश्वात्मक देवे' हा संदेश जगामध्ये जावा म्हणून गेली अनेक वर्षे ते प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या बरोबर 'सांप्रदायिक सद्भावाच्या' कार्यात सतत अग्रेसर आहेत व यावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. शुक्रवार ४ जुलै रोजी वाखरी, पंढरपूर येथे होणार्या 'श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा' यावर प्रकाश टाकणारा डॉ. एस. एन. पठाण यांचा लेख.

पंढरपूर वाखरी तळावर प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी विश्वशांती गुरूकुल इंग्रजी माध्यमाची शाळा स्थापन केली व संस्थेच्या याच परिसरात डॉ. विश्वनाथ कराड यांनी श्री विठ्ठल मंदिराची उभारणी करून या संस्थेला आध्यात्मिक बैठक दिली आहे. भू-वैकुंठी पंढरपुरी आषाढी एकादशीला लाखो वैष्णव (वारकरी) पंढरपूरला एकत्र येतात व त्यांच्या निस्सीम भक्तीचे दर्शन घडते. याच वारकर्यांमध्ये उत्तम आरोग्याचा संदेश देण्यासाठी डॉ. कराड सरांनी 'श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती स्पर्धा' एकादशीच्या पूर्वसंध्येला सुरू करून एका अभिनव कल्पनेने भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम घडवून आणला आहे. भक्ती आणि शक्तीचा हा अनोखा संगम म्हणजे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे एक वेगळेच दर्शन म्हणावे लागेल. यावर्षी या स्पर्धा



शुक्रवार दिनांक ४ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

आदिमानवापासून आत्म संरक्षणासाठी मानव चढाया-लढाया करत असे व त्यातूनच कुस्तीच्या द्वंदयुद्धाचा उगम झाला. कुस्ती हा शब्द 'कुश्ती' या फार्सी भाषेवरून तयार झाला आहे. कुस्ती म्हणजे मल्लयुद्ध, अंगयुद्ध किंवा बाहुयुद्ध होय. महाभारतातील वर्णनानुसार श्रीकृष्ण, बलराम, भीम हे मल्लविद्येत पारंगत होते. भारतीय कुस्ती तांबडी मातीवर खेळली जाते त्या मैदानास 'आखाडा' असे म्हणतात. समर्थ विष्णूदास वारकरी स्पर्धेसाठी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड साहेब यांनी वाखरी तळावरील त्यांच्या शैक्षणिक संस्थेत स्वतंत्र 'आखाडा' बांधून घेतला आहे.

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी या 'भक्ती आणि शक्ती'च्या अनोख्या संगमासाठी ही सोईस्कर जागा वारकर्यांसाठी निवडली आहे. महाराष्ट्रातील बहुतेक पालख्या आषाढ शुक्ल नवमीला वाखरी या गावी म्हणजे पंढरपूरच्या सीमावर्ती भागात मुक्कामाला पोहोचतात. यावर्षी ४ जुलै रोजी दुपारी १.३० वाजता हा आखाडा आयोजित करण्यात आलेला आहे. विश्वशांती गुरुकुलचा हा एकूण २० एकरांचा शैक्षणिक परिसर पुणे-पंढरपूर रोडवर वाखरी या पंढरपूरच्या सीमावर्ती भागावर आहे. परिसराच्या बाहेर उभारलेली भव्य कमान व स्वतंत्ररीत्या तयार करण्यात आलेले भव्य व्यासपीठ केवळ वारकर्यांच्या स्वागतासाठीच बांधण्यात आलेले असते.

नवमीला सकाळपासूनच पालख्यांचा ओघ वाखरीकडे यायला सुरू होतो, जणू तो वारकर्यांचा महापूरच असतो. वीणाधारक व तुळशीवृंदावन डोक्यावर घेऊन वारीमध्ये सहभागी झालेल्या वारकरी बंधु-भगिनींना भव्य व्यासपीठावर वस्त्र (शाल) व माऊलींची प्रतिमा देऊन त्यांचा डॉ. विश्वनाथ कराड सर सत्कार करतात. विठ्ठलाच्या भेटीसाठीची वारी पूर्ण होण्यापूर्वीच मिळालेली शाल व माऊलींची प्रतिमा यामुळे वारकर्यांच्या चेहर्यावरचा आनंद ओसंडून वाहत असतो. विविध मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार व्यासपीठावर वारकर्यांना देताना मान्यवरदेखील आनंदाच्या डोहामध्ये बुडून गेलेले असतात. मीसुद्धा या कार्यक्रमात सहभागी होतो व आनंदाचे डोही आनंद तरंगत असतो.

समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा ही वारकर्यांसाठींची स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रात खूप प्रसिद्ध आहे. अर्थात त्यासाठी विश्वशांती केंद्राच्या माध्यमातून याची माहिती महाराष्ट्रात प्रत्येक तालमीवर व गावोगावी पोहोचवली जाते आणि म्हणूनच या स्पर्धेसाठी अनेक हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते व अनेक कुस्ती प्रशिक्षक या स्पर्धेला हजेरी लावत असतात. कुस्त्यांच्या संयोजनाची जबाबदारी श्री. विलास कथुरे व डॉ. पी. जी. धनवे यांच्यावर असते. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री मा. श्री सुशीलकुमारजी शिंदे, माजी सभापती मा. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर हे प्रमुख पाहुणे असून मा. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आहेत. त्याचप्रमाणे श्री तुळशीराम दा. कराड, श्री. काशीराम दा. कराड, एमआयटी व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. मंगेशजी कराड, माईर्स एमआयटी, पुणे चे कार्यकारी अध्यक्ष श्री. राहुल वि. कराड, मा. श्री रमेश काशीराम कराड, मा. श्री राजेश का. कराड, प्रा. विलास कथुरे, प्रस्तुत लेखक स्वतः डॉ. एस. एन. पठाण आदी मान्यवर कुस्तीतज्ज्ञ व कुस्तीशौकिन उपस्थित राहणार आहेत.



दुपारच्या भोजनानंतर अत्यंत सुंदर असे महाराष्ट्रीय पद्धतीने फेटे बांधलेले हे सर्व मान्यवर मिरवणुकीने आखाड्याकडे रवाना होतात. त्या वेळी कुस्त्यांसाठी खास तयार करण्यात आलेले स्टेडियम वारकरी प्रेक्षकांनी खचाखच भरलेले असते. व्यासपीठावर सर्व मान्यवर स्थानापन्न झाल्यानंतर विधिवत आखाड्याची पूजा करून, विश्वशांती प्रार्थनेनंतर दीपप्रज्वलन होते व आखाड्याची सुरुवात होते. हे कदाचित संपूर्ण भारतातच नावीन्यपूर्ण असेल.

कुस्ती स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. कुशाबा पिंगळे व किसन बुचडे हे करतात. शंकरअण्णा पुजारी यांनी या स्पर्धेचे धावते वर्णन करतात, तर विलास कथुरे यांनी कुस्ती पंच म्हणून काम पाहतात. कुस्ती स्पर्धेसाठी लातूर, परभणी, औरंगाबाद, जालना, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर इ. भागांतून शेकडो वारकरी मल्ल आलेले होते. सुमारे ४ तास आखाडा सुरू असतो व विविध वयोगटांत यशस्वी झालेल्या मल्लांना भरघोस बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येतात. नंतर कुस्तीमध्ये विजय प्राप्त झालेल्या महावीरांची मिरवणूक निघते. ही मिरवणूक पालख्यांच्या स्वागतासाठी खास उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर येऊन तेथे त्या सर्व वारकरी मल्लांचा प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात येतो. त्यावेळी श्री. राजेंद्र रणभोर व श्रीमती गोदावरी मुंडे यांचे भजन गायन ही आयोजित केले आहे. त्यावेळी तेथील सर्व वातावरण हे भक्तिमय होते आणि अशा पद्धतीने भक्ति आणि शक्तिचा सुरेख संगम उपस्थित वारकर्यांना व पाहुण्यांना भारतीय संस्कृतीच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे नयन मनोहर दर्शन घडवितो.

लेखक माजी कुलगुरू व आळंदी येथील विश्वशांती केंद्राचे समन्वयक आणि सल्लागार आहेत.

संपर्क ९८२२३६२६०३

**– डॉ. एस. एन. पठाण**
**माजी कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,**
**माजी उपाध्यक्ष, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, भारत सरकार, नवी दिल्ली,**
**सल्लागार, विश्वशांती केंद्र (आळंदी), पुणे, भारत.**

# हत्तीकणबस केंद्रशाळेत वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : केंद्रशाळा हत्तीकणबस ता.अक्कलकोट येथे गावातील प्रतिष्ठित नागरिक माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष श्री. बसवराज बिराजदार काका यांनी आपले नातू प्रद्युम्न पंडीत बिराजदार व प्रज्ञा मल्लिनाथ बिराजदार यांचे दुसरे वाढदिवस जिल्हा परिषद शाळेत गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन मोठ्या उत्साहात वाढदिवस साजरा केले. या अनोख्या उपक्रमाचे दुसरे वर्ष असून सतत पाच वर्षे शाळेतच वाढदिवस साजरा करण्याचा त्यांनी संकल्प केला असून सर्व ग्रामस्थ व पालकांमधून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक होत आहे. यावेळी शाळेचे माजी केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी सर, गावचे सरपंच श्री. श्रीशैल माळी, सेवानिवृत्त इन्कम टॅक्स ऑफिसर श्री. शंकर बिराजदार, सैदप्पा निंबाळे (माजी अध्यक्ष) माजी तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश बिराजदार, पोलीस पाटील महादेवी पाटील, तंटामुक्त अध्यक्ष हणमंत बिराजदार, राजू उण्णद, बाबूराव हिरापुरे, श्री. शरणप्पा धनाळे, मुख्याध्यापक श्री.राजशेखर करपे व सर्व शिक्षक स्टाफ कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिस्तबध्द नियोजन केले होते श्री. मुर्डी सर व सरपंच श्रीशैल माळी यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी श्री. राजाराम सुरवसे सर यांनी सर्वांचे आभार मानले.



# लगोरी झाली रे मित्रा.... अरे... दे... लगोरी..



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क** : शैक्षणिक कार्याबरोबर विद्यार्थी जीवनात खेळ महत्त्वाचे आहे. तेव्हा गोदिंया तालुक्यातील नंगपूरामुर्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा याठिकाणी सायंकाळच्या सुमारास लगोरी झाली रे मित्रा... अरे... दे... अशा घोषणा देत हा सांघिक खेळ रंगला होता. यावेळी विद्यार्थी खेळच्यात धुंद झाले.

– छायाचित्र मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ मार्फत थेट कर्ज योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील दरिद्रय रेषेखालील गरजू घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी, तसेच त्यांना स्वंयरोजगाराच्या अधिअधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने, दि. ०४ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णय नुसार महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजने अंतर्गत कर्जाची मर्यादा रक्कम रु. २५०००/-वरुन रक्कम रु.१०००००/- लाख पर्यंत वाढविण्यात येऊन थेट कर्ज योजना राबविण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

थेट कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रक्कम रु.१.०० लाख करण्यात आली असून यामध्ये महामंडळाचा हिस्सा रु.८५००० (८५%), अनुदान रक्कम रु.१००००(१०%), अर्जदाराचा सहभाग रु.५००० (५%) असे एकूण १००००० (१००%), ३ वर्ष (३६ महिने) या कालावधीसाठी द.सा.द.शे. ४% व्याज दराप्रमाणे कर्ज रक्कम वितरीत करण्यात येणार आहे. सदर योजने अंतर्गत रक्कम रु.१.०० लाख पर्यंतचे प्रकल्प मर्यादपर्यंत असलेले लघु उदयोग करता येतील.

महामंडळाच्या मुख्य कार्यालयाचे परिपत्रक नुसार थेट कर्ज योजना (रक्कम रु.१.०० लाख) राबविणेकरिता जिल्हा निहाय उहिष्ट, अटी शर्ती नियम निकष व पात्रतेसह परिपत्रक प्राप्त झाले असून .उहिष्ट वितरण: सदर योजनेत साधारणपणे पुरुष ५०% व महिला ५०% आरक्षण राहील.

ग्रामिण भागासाठी प्राधान्य राहील. राज्यस्तरावरील क्रिडा पुरस्कार व्यक्तीना प्राध्यान राहील. सैन्य दलातील वीरगती प्राप्त वारसाच्या घरातील एका सदस्यास प्राधान्याने लाभ देण्यात येईल.

**सदर योजनेच्या पात्रता व निकष :-**

अर्जदार मांग, मातंग, मिनी-मादीग, मादीग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी. मांग गोराडी, मादगी व मादिगा जातीतील असावा, अर्जदार महाराष्ट्रातील रहीवाशी असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे. अर्जदाराने यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु. ३०००००/- (तीन लाख) यापेक्षा जास्त नसावे. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल,

अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्ड जोडलेल्या बैंक खात्याचा तपशिल सादर करावा, अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव/प्रशिक्षीत असावा. अर्जदाराचा उळलळश्र ऊीशवळीं डलेीश ५०० च्या वर असावा.

**कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे व दस्तऐवज खालीलप्रमाणे.:-**

जातीचा दाखला (सक्षम अधिकारी यांच्याकडून घेतलेला असावा), अर्जदाराच्या कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला (रु.३०००००/- पर्यंत), नुकतेच काढलेले फोटो (दोन), अर्जदाराचा शैक्षणिक पुरावा/शाळेचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड, ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे, त्या जागा उपलब्धेचा पुरावा भाडे पावती, करारपत्र) व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र व अनुभव दाखला. यापूर्वी शासकीय कर्ज योजनेचा व अनुदानाचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र फेडेव्हिटसह, शॉपक्ट/ग्रामसेवकाचे व्यवसाय करण्यास ना हरकत दाखला, कोटेशन (व्यवसाया संदर्भात साहित्य/माल खरेदीचे दरपत्रक)

अर्जदारास महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार व्यवसायास अनुरुप असलेली आवश्यक ती कागदपत्रे प्रमाणपत्रे/करारपत्रे कर्ज मागणी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**कर्ज प्रक्रिया:**

कर्ज प्रकरण कार्यालयाकडे प्राप्त झाल्यास, परिपूर्ण असे कर्ज प्रस्ताव लाभार्थीच्या निवडीसाठी, प्रथम लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी व मंजूरीस्तव सादर करण्यात येतील, प्राप्त झालेले कर्ज प्रस्तावाची संख्या उहिष्टांपेक्षा जास्त असल्यास, लाभार्थीची निवड चिठ्ठीव्दारे (लॉटरी पध्दतीने) करण्यात येईल. अर्जदाराच्या उळलळश्र ऊीशवळीं डलेीश ५०० च्या वर आहे किवा कसे याबाबत कर्ज मंजूर झाल्यानंतर अहवाल सादर करावा लागेल.

कर्ज मंजूरीची प्रक्रिया झाल्यानंतर कर्ज प्रकरणी कर्ज वसुलीसाठी दोन सक्षम जामिनदार घेण्यात येतील. १. ०१- जामिनदार-शासकीय/निमशासकीय नोकरदार/अनुदानीत संस्था मधील कर्मचारी असावा, त्यांचे

कार्यालयाकडून वसुलीसाठी हमीपत्र घ्यावे लागेल. (जामिनदार कागदपत्रे-रु.१०० बॉन्डवर प्रतिज्ञापत्र, कार्यालयाचे ओळखपत्र, मागील ०३ महिन्याचे पगार पत्रक, मागील ०६ महिने बैंक स्टेटमेंट पासबुक झेरॉक्स, आधारकार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड झेरॉक्स. ०२ फोटो, इ.)

एक जामिनदार मालमत्ताधारक / जमीनदार असावा, त्यांचे मालमत्तेवर महामंडळाच्या नावे कर्जाचा बोजा नोंद करावा लागेल. (जामिनदार कागदपत्रे ७/१२ किया ८-अ उत्तारा, आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅन कार्ड, रु.१०० च्या बाँडवर प्रतिज्ञापत्र व इ.) सहभाग रक्कमेपोटी रु.५०००/- चा धनाकर्ष महामंडळाचे नावे जमा करावा लागेल. कर्ज वितरणापूर्वी लाभार्थीकडून वसुलीपोटी २० उत्तर दिनांकित धनादेश घेण्यात येतील. कर्जदाराच्या वारसाचे रु.१००/- च्या बॉन्डवर वारसदार म्हणून प्रतिज्ञापत्र, इतर वैद्यानिक दस्ताऐवजांची पुर्तता करणे बंधनकारक आहे. ३ वर्ष (३६ महिने) कालावधीसाठी द.सा.द.शे.४% व्याज दराने कर्ज रक्कम वितरीत केली जाईल.

जिल्हा कार्यालय सोलापूर मार्फत थेट कर्ज योजनेमध्ये कर्ज मागणी अर्ज वितरण दिनांक ०१ जुलै २०२५ ते दिनांक २० जुलै २०२५ पर्यंत करण्यात येणार असून व कागदपत्रांच्या पुर्ततेसह दिनाक ०१ जुलै २०२५ ते दिनांक २० जुलै २०२५ रोजी पर्यंत अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही करण्यात येणार आहेत.

तरी इच्छुक वर उल्लेखीत जातीतील गरजु व होतकरुनी महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, शासकीय विश्रामगृहाच्या पाठीमागे, बीग बजार समोर, सोलापूर येथे मुळ जातीचा दाखला, आधारकार्ड व इतर कागदपत्रासह स्वतः उपस्थित रहावे, त्र्यस्थांकडे अर्ज दिला जाणार नाही किंवा अर्ज स्विकारला जाणार, या करिता कार्यालयात स्वतः प्रत्यक्ष हजर राहणे बंधनकार आहे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, आर. एच चव्हाण, यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# बॉम्बे बार असोसिएशनतर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार

## मुंबई उच्च न्यायालय, बॉम्बे बार असोसिएशनने मला घडवले : सरन्यायाधीश भूषण गवई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाची ही इमारत, बॉम्बे बार असोसिएशन आणि इथल्या माझ्या सहकाऱ्यांनी मला घडवलं. आज जे काही आहे ते या संस्थांमुळेच. बॉम्बे बार असोसिएशन ही संस्था माझी कुटुंबासारखी आहे. या संस्थेच्या पाठिंब्याशिवाय मी आज या पदावर असू शकलो नसतो. ही वकिल संघटना म्हणजे न्यायव्यवस्थेला विचारवंत देणारी मातृसंस्था आहे, अशा शब्दांत भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भावना व्यक्त केल्या.



न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल बॉम्बे बार असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री. गवई बोलत होते. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे, श्री. गवई यांच्या सुविद्य पत्नी डॉ. तेजस्विनी गवई, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग, महाराष्ट्र गोवा बार असोसिएशनचे अध्यक्ष विठ्ठल देशमुख, राज्याचे महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, डव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत रेळेकर, बॉम्बे बार असोसिएशनचे अध्यक्ष नितीन ठक्कर, उपाध्यक्ष व्ही आर धोंड, सचिव फरहान दुभाष आदी उपस्थित होते.

आज सत्कार होत असलेल्या कोर्टरुमध्येच लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी केलेली स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, ही गर्जना आजही आपल्याला प्रेरणा देते, असे सांगून न्यायमूर्ती श्री. गवई यांनी आजपर्यंतचा प्रवास उलगडला. न्यायमूर्ती गवई यांनी आपल्या कारकिर्दीत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर व गोवा खंडपीठांवर काम करतानाचे अनुभव सांगितले आणि हे सर्व अनुभव त्यांच्या न्यायिक दृष्टिकोनाच्या जडणघडणीत कसे उपयुक्त ठरले, हेही स्पष्ट केले.

सरन्यायाधीश श्री. गवई म्हणाले की, संविधान हेच आमचे अंतिम मार्गदर्शक तत्त्व आहे आणि न्यायाधीश म्हणून आमची जबाबदारी केवळ अधिकार वापरण्याची नाही, तर कर्तव्य बजावण्याचीही आहे. रिक्त न्यायाधीश पदं भरली गेली तर प्रलंबित खटल्यांवर नियंत्रण येईल. आम्ही नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणत आहोत.

गेल्या काही दिवसांत अनेक नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

त्यांनी बार असोसिएशनने सुरू केलेल्या 'पॉडकास्ट सिरीज', व 'बीबीए ॲप'चे कौतुक केले.

कार्यक्रमात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता न्यायमूर्ती गवई यांचे विशेष कौतुक करताना म्हणाले की, न्यायमूर्ती श्री. गवई यांची विधी आणि संविधानातील जाण, विनम्रता आणि कायद्याचा अभ्यास यांचे उदाहरण देशभरातील न्यायाधीशांसाठी आदर्श आहे. नागपूरमधील न्यायालयातून सुरू झालेली न्यायमूर्ती गवई यांची कारकीर्द ही मेहनत, प्रामाणिकपणा आणि मूल्यनिष्ठा यांचे प्रतिक आहे. न्यायमूर्ती श्री. गवई यांचा मुंबई उच्च न्यायालयातील काळ केवळ त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांसाठीच नव्हे, तर त्यांच्या शांत संयमी, प्रखर कायदेशीर बुध्दिमत्ता आणि सौम्य विनोदबुद्धीसाठीही लक्षात राहतो. त्यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून निवड हा फक्त मुंबई बारच नव्हे, तर संपूर्ण मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठीही गौरवाचा क्षण आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. आराधे यांनी मनोगतात श्री. गवई यांच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, लोकसेवा व न्यायव्यवस्था हीच खरी सेवा हे श्री. गवई यांचे तत्वज्ञान आहे. त्यांनी आतापर्यंत दिलेले निर्णय न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता आणि संविधान निष्ठा दर्शवतात. ते दूरदर्शी आहेत. त्यांच्या निर्णयांमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला.

यावेळी महाधिवक्ता श्री. सराफ, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री. सिंह यांनीही मनोगत व्यक्त केले. बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नितीन ठक्कर यांनी प्रास्ताविक केले. सचिव फरहान दुभाष यांनी सूत्रसंचालन केले.

# पडघा बस स्थानकाच्या छताला बांबूचा आधार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : वाढत्या नागरीकरणामुळे शहराकडे वाटचाल करणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा बस स्थानकाची दुरवस्था झाली आहे. अनेक वर्षापासून हा बस स्थानक आहे. या स्थानकाच्या छताला बांबूचा आधार लावल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. यांचे गांभीर्य लक्षात घेता लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी पडघा बस स्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत भिवंडी आगार प्रमुख तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांना निवेदन दिले आहे. तर राज्य परिवहन मंत्री यांना ईमेल द्वारे अर्ज पाठविला आहे. सद्या पावसाचे दिवस असल्याने छप्पर गलती होता होत आहे. तर पडघा बस स्थानकातील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पडघा परिसरातील खेड्यापाड्यांमध्ये झालेल्या नागरीकरणामुळे व्यापारी केंद्र झाले आहे. विविध कामांसाठी हजारो नागरिक, चाकरमानी, विद्यार्थी बस स्थानकावरून प्रवास करतात. मुंबई व उपनगरात तर कल्याण, भिवंडी, वासिंद, शहापूर येथे जाण्यासाठी येथूनच प्रवास करतात. तसेच कल्याण, भिवंडी, शहापूर, खडवली या ठिकाणांसाठी बस सुटतात. उन्हाळाचे दिवस होते तेव्हा देखिल प्रवाशांना उन्हाची झळ बसल्याने , उन्हापासून संरक्षण होण्यासाठी सावली मिळावी म्हणून बस स्थानकाचा आधार घेण्यासाठी बस स्थानकाची बिकट अवस्था पाहून बस स्थानकामध्ये बसू शकत नव्हते. परंतु आता पावसाळा सुरू झाला असून प्रवाशांचे पाण्यापासून संरक्षण होण्यासाठी संरक्षित जागी बस स्थानकामध्ये उभे राहण्यासाठी पडघा बस स्थानक एकमेव ठिकाण असून भिवंडी आगार प्रमुख तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग




**लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टने केली दुरुस्तीची मागणी**

यांनी लवकरात ,लवकर पडघा बस स्थानकाची दुरुस्ती करावी. अशी मागणी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी केली आहे.



# कल्याणशेट्टी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वांग्मय मंडळाच्या वतीने स्वामी विवेकानंद पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते

यावेळी बोलताना भरमशेट्टी म्हणाले की, स्वामी विवेकानंद त्यांनी शिकागोच्या धर्म परिषदेत वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान सांगितले, तेव्हा जगातील उपस्थित सर्व धर्मगुरूंनी कौतुक केले. त्यानंतर संपूर्ण भारतभर फिरून स्वामीजींनी हिंदू धर्माचा प्रचार केला.

दुसऱ्याच्या धर्माचा द्वेष करू नका, सर्व धर्म समभाव वृत्ती जोपासली पाहिजे, सर्व धर्मातील चांगले विचार आचरणात आणावेत असा त्यानी संदेश दिला. म्हणून युवकांनी त्यांचे विचार आचरणात आणावेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा मधुबाला लोणारी यांनी केले, आभार प्रा मनीषा शिंदे यांनी मानले कार्यक्रम प्रसंगी प्राध्यापिका शीतल फुटाणे, प्राची गणेचारी, शिल्पा धूमशेट्टी, नेहा गंदमल व विद्या बिराजदार उपस्थित होते.

# पत्रकार चंद्रशेखर भांगे यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघ पुणे यांच्या वतीने आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने आपल्या संघाचे कार्याध्यक्ष तथा युवा प्रबोधनकार संविधान प्रचारक,विद्यार्थी नेते आयु. सागर सोनकांबळे यांच्या संकल्पनेतून दापोडी येथील सरस्वती अनाथ आश्रम येथील मुलांना शालेय साहित्य वाटप तथा अन्नदान उपक्रम राबवण्यात आला डॉ. बाबासाहेब आंबेडकरआणि राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व संविधान प्रस्तावणेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली यावेळी प्रमुख उपस्थिती लोकशाही मराठीचे पत्रकार चंद्रशेखर भांगे रहिवासी संघाचे संस्थापक प्रा.राहुल रुही,पत्रकार नितीन पाटणकर, रमेश वटार, दगडु सोनकांबळे, समाधान दुपारगुडे, गंगाराम पाटील,श्रीकांत मडीखांबे , प्रकाश चांबारे, आश्रम शाळेचे देविदास सुरवसे महादेव गायकवाड, मंजुनाथ वटार आदी उपस्थित होते

# श्री ज्ञानेश्वर महाराज पालखीचे माळशिरस नगरीत स्वागत झाल्यानंतर माऊलीच्या पालखीसोबत येणाऱ्या भाविकांना वारकऱ्यांना पाणी बॉटल, बिस्कीट, चहा वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस तालुका जिल्हा परिषद सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित माळशिरस यांच्या वतीने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखीचे माळशिरस नगरीत आगमन झाल्यानंतर माऊलीच्या पालखी सोहळ्यात पाई वारी करणाऱ्या पदचारी वारकऱ्यांना व भाविकांना पंचायत समिती माळशिरसचे प्रवेशद्वारावरती चहा बिस्किटे पुढे व पाणी बॉटल वाटप करण्यात आले यावेळी संस्थेचे संचालक मंडळ व सभासद सर्व वर्ग उपस्थित होते संस्थेच्या या सुत्यो उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी माळशिरस तालुक्यामध्ये श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखीचे माळशेज नगरीत आगमन झाल्यानंतर सोबत पायी वारी करणाऱ्या पदाचारी वारकऱ्यांना व भाविकांना चहा व बिस्कीट पुढे पाणी बॉटल इत्यादीचे वाटप जिल्हा परिषद सेवकांचे सहकारी पतसंस्था मर्यादित माळशिरस यांच्या वतीने करण्यात आले.



**मंदिर समितीकडून जर्मनी हँगरची सुविधा**

**भाविकांना पददर्शन रांगेत जाण्यासाठी पाच कि.मी.चे अंतर कमी होणार आहे.**

# दर्शनरांगेतील भाविकांसाठी गोपाळपूर येथे दोन जर्मन हॅंगरची उपलब्धता : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होत आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा तसेच अन्य पालखी सोहळ्यांचे पंढरपूर तालुक्यात आगमन झाले आहे. श्री.विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून, दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत गेली आहे. पद दर्शनासाठी आलेल्या भाविकांना दर्शनरांगेत येण्यासाठी फार लांब जाता येऊ नये. यासाठी गोपाळपूर हद्दीत मंदिर समितीकडून सर्व सुविधायुक्त दोन जर्मन हँगरची उपलब्धता केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पद दर्शन रांगेतील भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे तसेच पददर्शन रांगेसाठी जास्त लांब चालत जाता येऊ नये यासाठी गोपाळपूर येथे जर्मन हँगर उभा करण्यासाठी खाजगी मालकीचे अडीच एकर घेण्यात आले असून, या ठिकाणी जर्मन हँगर उभा करण्याचे काम सुरू आहे. पददर्शन रांग या ठिकाणाहून सुरू केल्यास जवळपास तीन किलो मीटर पर्यंतचे दर्शन रांग यामध्ये राहील तसेच आसरा हॉटेल जवळपास एक जर्मन हँगर तयार झाला असून दोन किलोमीटर पर्यंतची दर्शन रांग यामध्ये राहील. पददर्शन रांगेतील भाविकांसाठी दोन जर्मन हँगरची उपलब्धता केल्याने भाविकांना पददर्शन रांगेत जाण्यासाठी पाच कि.मी.चे अंतर कमी होणार आहे. या ठिकाणी भाविकांना सुरक्षा स्वच्छ पिण्याचे पाणी सुलभ शौचालय आदी आवश्यक सुविधा मंदिर समितीकडून उपलब्ध करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली

तसेच गोपाळपूर -रांझणी रोड वरील दर्शन रांगेत लाईट नसल्याने, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिनांक ३ जुलै रोजी रात्री १२.३० वाजता भेट देऊन संबंधित यंत्रणेना सूचना दिल्या व त्या ठिकाणी तात्काळ प्रकल्प प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षा रक्षकांची नेमणूक देखील करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

## मुलांसह महिला बेपत्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/प्रतिनिधी : येडोळा ता.तुळजापूर येथिल एक विवाहित महिला दोन वर्षाच्या लहान मुलासह कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेल्याची घटना घडली आहे.

या बाबत नळदुर्ग पालीस ठाणे येथे बेपत्ता महिलेचा, पति अतुल तुकाराम कांबळे यानी लेखी तक्रार दिली असून त्यात म्हटले आहे की, दि.२३ जून २२५ रोजी सकाळी ठिक ८.३० वा. दरम्यान माझी पन्ति ज्योती आतुल कांबळे अंदाजे वय २५ वर्षे व मझा लहान मुलगा शिवांश अतुल कांबळे वय दोन वर्षे याला सोबत घेवून तसेच घरातील रुपये ३२,००० रु रोख व ३ तोळे सोन्याचे गंठन घेवून कोणालाही काहीही न सांगता निघून गेली आहे. सगळीकडे शोधा शोध केली असता कोठे ही अढळून येत नाही.

तरी कोणाला आढळल्यास मो.न. ८७८८९७१९५८ या क्रमांकावर संपर्क करावा असी विनंती केली आहे.

बेपत्ता महिलेचे पाति अतुल तुकाराम कांबळे यानी नळदुर्ग पोलीस ठाणे येते दिलेल्या अर्जावरून सदर घटनेची नोंद नळदुर्ग पोलीस ठाणे येते करण्यात आली आहे.

**थोडक्यात...**

### अर्वाच्या भाषेत शिवीगाळ करून मारहाण; दोघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : अर्वाच्या भाषेत शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १ फेब्रुवारी २०२२ ते ३ डिसेंबर २०२४




दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी पंढरपूर येथे घडली.याप्रकरणी फरीदा सलीम पठाण (वय-४५,रा.भूषण नगर भाग २, वांगी रोड) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सलीम दगडू पठाण उर्फ डुम्या जावेद मुलाणी दोघे (रा. दुघेश्वर प्रशालेजवळ,मेंढापूर तालुका पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी फरीदा पठाण यांना वेळोवेळी अर्वाच्या भाषेत शिवीगाळ करून मारहाण करत शारीरिक व मानसिक त्रास देत घरातून हाकलून दिल्याची फिर्याद फरीदा यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून वरील दोघनविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार कुंभार हे करीत आहेत.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली पत्राशेड व दर्शन रांगेची पाहणी

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वारकरी भाविकांशी साधला संवाद, दुचाकीवरून दर्शनरांगेची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होत आहे. आषाढी यात्रा सोहळा कालावधीत राज्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रम णात भाविक येतात. श्री.विठ्ठल रुक्मि णीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून, दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत गेली आहे. पददर्शन रांगेत तसेच पत्राशेड येथे भाविकांसाठी मंदीर समिती व प्रशासन वतीने आवश्यक मुबलक सोयी सुविधा उपलब्ध केल्या असून, या उपलब्ध सोयी सुविधांची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली.




पददर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, तसेच पद दर्शन रांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीकडून करण्यात आलेल्या उपायोजनांची माहिती घेतली. तसेच या ठिकाणी भाविकांसाठी उपलब्ध केलेली शौचालये, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधांची पाहणी केली.

तसेच पददर्शन रांगेतील भाविकांशी संवाद साधून मंदीर समितीकडून पत्राशेड, दर्शनरांगेत उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी दर्शनरांगेतील भाविकांना मोफत अन्नदान सुरु केले असुन या अन्नदानाचे वाटपही पालकमंत्री जयकुम ार गोरे यांनी केले. वारकरी भाविकांसाठी मंदीर समिती व प्रशासनाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची कमतरता भासणार याची घ्यावी अशा सूच-नही पालकमंत्री यांनी यावेळी दिल्या. त्याचबरोबर पाहणी करताना वारकरी व भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पालकमंत्री टुव्हीलरवरुन दर्शनरांगेची गोपाळपूर पर्यंत पाहणी केली.

यावेळी मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर प्रशासनाकडून पत्राशेड, दर्शनरांग, दर्शनमंडप, मंदीरात भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांबाबतची माहिती दिली. तसेच दर्शनरांगेतील भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

यावेळी त्यांच्या समवेत पाहणी करताना कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, सांगोला तहसिलदार संतोष कणसे उपस्थित होते.

## पडलेले झाड हटवून वाहतूक सुरळीत करण्यात रमझान शेख तत्पर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी अडथळे निर्माण झाले आहेत. अशाच एका घटनेत, काल रात्री खारघर सेक्टर ३४ परिसरात एका मुख्य रस्त्यावर झाड कोसळल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या परिस्थितीची दखल राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे रमझान शेख यांनी घेतली व तत्काळ घटनास्थळी जाऊन मार्गदर्शन केले.

वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन रमझान शेख यांनी पनवेल पालिका प्रशासनाशी संपर्क साधला. त्यांच्या विनंतीवर तात्काळ प्रतिसाद देत पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी कुणाल गायकवाड यांनी झाड हटविण्यासाठी आवश्यक म नुष्यबळ आणि साहित्य उपलब्ध करून दिले. त्यांच्या सहकार्यामुळे काही वेळातच झाड हटवण्यात आले आणि वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

या तत्पर कार्यवाहीबद्दल परिसरातील नागरिकांनी रमझान शेख आणि पनवेल महानगरपालिका पालिका अधिकारी कुणाल गायकवाड , ओमकार गायकर आणि त्यांची टीम यांचे मनःपूर्वक आभार मानले. नागरिकांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहून वेळीच हस्तक्षेप करणं हे लोकप्रतिनिधीचं खरे कार्य असल्याचं यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे.

## पंढरपूरचा कॉरिडॉर रद्द करा तर मंगळवेढ्याची हद्दवाढ मंजूर करा राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नगरपरिषदेचे हद्द वाढ झाल्यास विकासाच्या अनेक योजना राबवणे सोयीचे होणार आहे. त्यामुळे हद्दवळीच्या प्रस्ता-वास मंजुरी देण्यात यावी तसेच पंढरपूर हे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामुळे महाराष्ट्राचे भारता-तील लाखो भाविक भक्तीच्या श्रद्धास्थान आहे.

पंढरपूरचा प्रस्तावित कॉरिडॉर रद्द करावा व मंगळवेढा नगरपरिषदेची हद्द वाढ मंजूर करा या मागणीचे निवेदन भैरवनाथ उद्योग समूहाचे अध्यक्ष अनिल (दादा) सावंत यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आषाढी वारीच्या निवेदनासाठी आले असता पाहणी दौऱ्यात त्यांना निवेदन देण्यात आले.

## भैरवनाथ कानडे यांना कोलंबो विद्यापीठाचा मानद डॉक्टरेट सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/स.के. गायकवाड : शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ सेवा, ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेले योगदान आणि सामाजिक व साहित्य क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेत श्रीलंकेतील नामवंत कोलंबो विद्यापीठाची शैक्षणिक क्षेत्रातील मानद डॉक्टरेट (सन्माननीय पदवी) हा सन्मान तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा येथील श्री .भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक भैरवनाथ खंडू कानडे यांना प्रदान करण्यात आला .

आळंदी पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विशेष सोहळ्यात ईगल ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी भागवत काटकर , कोलंबो




विद्यापीठाचे महाराष्ट्र राज्य संयोजक मदन रेंगडे, जा-लना सहाय्यक धर्मादाय कार्यालयाच्या उपायुक्त मनीषा आवटे, संयोजक ॲड. आकाश पुजारी यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. विद्यार्थ्यांविषयी अस-लेली तळमळ, शिक्षणातील सातत्यपूर्ण प्रयोगशीलता आणि सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाच्या माध्यमातून उभारलेले योगदान या सर्व बाबींचा गौरव करत हा सन्मान देण्यात आला.

या सन्मानामुळे मराठी भाषिक शिक्षक समुदायाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून नवी दिशा देणारे शिक्षक म्हणून भैरवनाथ कानडे यांचे कार्य समाज हितासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## आषाढी एकादशी निमित्त काळेगाव येथे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील सांगवी बु लगत असलेले काळेगाव येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आयोजित आषाढी एकादशी निमित्ताने अनेक भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, हरिपाठ, भव्य कीर्तन सोहळा व भरुडांची जुगलबंदी असे अनेक कार्यक्रम आषाढी एकादशी निमित्त असून, त्याची रूपरेषा रविवारी दि. ०६ रोजी पहाटे ४ वाजता श्रीच्या मूर्तीस अभिषेक महापूजा व नंतर दिवसभर फराळीचा कार्यक्रम दरम्यान, दुपारी १२ते ०४ पर्यंत श्री राम कृष्ण हरी महिला भजनी मंडळ अक्कलकोट यांचे भजन कार्यक्रम व सायंकाळी ५ ते ७ श्री संत मारुती महाराज शिक्षण संथा कानेगाव यांचे हरिपाठ व तद नंतर रात्री ८ ते ११.३० पर्यंत भव्य कीर्तनकार ह भ प राजेश महाराज पाटील भालकी, जि बिदर यांचे कीर्तन होणार आहे. तसेच रात्री ११.३० ते पहाटे ४ वाजेपर्यंत भरुडांची जुगलबंदी कार्यक्रम संपन्न होणार असून, दुसऱ्या दिवशी दि. ०७ सोमवार रोजी सकाळी पासून दिवसभर महाप्रसादा-चे आयोजन करण्यात आले आहे. या आषाढी एकादशी निमित्त अतिशय भक्तीमय वा-तावरणात अनेक भव्य दिव्य कार्यक्रम संपन्न होणार असून या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आव्हान काळेगाव विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**भव्य कीर्तन, भरुडांची जुगलबंदी भजन, असे अनेक कार्यक्रम**

